


# पाणीच पाणी

. सं. वाचनालय, ठाणें
वय बाल १०-५४
क्र. ६२९९

IRBK-0106299
IRBK-0106299



प्रताप-कारले प्रकाशन पुणें २.

ग्रामविकास माला

पुष्प पाचवे

# पाणीच पाणी

लेखक

रा म त न य

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

न. म. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ६२९९ नों. दि.
वि. पा-पा क्र.

१९५

IRBK-0106299


किंमत ८ आणे

: प्रकाशक :

**स. आ. जगताप**

जगताप-कारले प्रकाशन,

१९२ शुक्रवार, पुणें २



: मुद्रक :

**मा. र. कारले**

जनसेवा मुद्रणालय,

१९२ शुक्रवार, पुणें २.

# लेखकाचें निवेदन

ग्रामविकास मालेंतील ‘ **पाणीच पाणी** ’ हें पांचवें पुष्प होय. तरडगांव हें खेडेगांव देशावरील घेतलें असून तेथें पाऊस कमी पडत असतो. अशा ठिकाणचा विकास क्रमाक्रमानें कसा होऊं शकतो, हे वास्तववादी स्वरूपांत दाखविण्याचा या मालेचा हेतु आहे. प्रस्तुत पुष्पांत मुख्यत: गांवांतील पाणी पुरवठा हा विषय आलेला आहे.

शिवारांतील वाया जाणारें पावसाचें पाणी एके ठिकाणीं नेण्याची विशेष योजना करून तेथें तळें बांधण्यांत आलें आणि त्याच्या पायथ्याच्या बाजूस विहिरींची योजना केली तर तळ्यांतील पाणी झिरपून त्या विहिरींना मिळतें, हीही गोष्ट या पुस्तकांत स्पष्ट केलेली आहे.

याशिवाय सामाजिक सुधारणांची रूपरेखाही या पुष्पांत आहे. परमेश्वरावरील श्रद्धेमुळें मानसिक शुद्धि होऊन माणसांची दानत वाढते, हेंही या पुस्तकांत सूचित केलेलें आहे.

या पांचही पुस्तकांत विकेंद्रीकरणाचें स्वरूप स्पष्ट केलेलें आहे. भारताची उन्नति खेड्यांत सहकारी पद्धतीनें कार्य करूनच व्हावयाची आहे. ‘ खालून वर जाणें ’ हेंच विकेंद्रीकरणाचें वास्तव स्वरूप आहे.

या मालेस सरकार व जनता यांचा भरपूर आश्रय पुरेसा मिळेल असा लेखकास भरंवसा वाटतो. हा आश्रय पुरेसा मिळाला, म्हणजे लेखक व प्रकाशक पुढील भाग जनतेपुढें आणूं शकतील.

विजयादशमी
शके १८७८

— समतनय

अनुक्रमांक २१७६६
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ७६१
नों. दि. १५।२।५६

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. नवा चमत्कार | ... | ५ |
| २. पक्का पानाडी | ... | १० |
| ३. ओघळीचा ओढा झाला ! | ... | १३ |
| ४. बांधकामातील अडचणी | ... | १८ |
| ५. तळ्याचे बांधकाम | ... | २३ |
| ६. रहाटाच्या विहिरी | ... | २५ |
| ७. पाणीच पाणी | ... | २८ |

# पाणीच पाणी

२९४६६
वाङ्‌मय
७८७
दि. १५।२।५८

## १. नवा चमत्कार

तरडगाव नापीक गाव म्हणून प्रसिद्ध होते. आता ते सुपीक झाले होते, पण तेथे मुख्यतः कोरडवाहूच पिके येत होती. याचे कारण गावास पाणी पुरवठा भरपूर नव्हता, हे होय.

पिण्याच्या पाण्यासाठीही लोकांचे फार हाल होत होते. श्रीपतरावांच्या घरातील आड काय तो जिवंत पाण्याचा होता. त्यावर पाणी भरणारांची झुंबड सकाळी व सायंकाळी पडत असे !

श्रीपतरावानी आपल्यासाठी त्या आडास पंप लावून न्हाणीघरात पाणी आणले होते. उन्हाळ्यात दमले भागलेल्याना पिण्यास पाणी मिळावे, यासाठी ते गार पाण्याचे रांजण भरून त्यांच्या घरी ठेवीत असत.

गणपत पाटलांच्या व आणखी एका दोघांच्या घरी असेच आड होते. पण त्यापैकी पाटलांच्या आडाचे पाणी गोडे असून इतरांच्या आडांचे पाणी मचूळ होते. त्याही आडात उन्हाळ्यात पाण्याचा खडखडाटच असे !

हरिजन वस्तीत एक विहीर होती. तिलाही पुरेसे


पाणी नव्हते. गावातील कांही शेतात गोड्या पाण्याच्या विहिरी होत्या. पण त्या दोन मैलांच्या अंतरावर होत्या. त्या विहिरींचे पाणी, हरिजनानाच काय पण इतर गावकऱ्यानाही आणावे लागे !

अशी ही पाण्याची टंचाई श्रीपतरावांच्या ध्यानात आली नव्हती, असे नाही. पण लोकात करावयाच्या सुधारणाना त्यांचीच प्रेरणा कारणीभूत झाली तर, त्या सुधारणा यशस्वी होतात, हा नियमही त्याना चांगला परिचित होता.

शिवाय त्यांची ही खात्री होती कीं, लोकांच्या पोटापाण्याची सोय होऊन सुस्थिति प्राप्त झाली म्हणजे इतर सुधारणा त्यानाच सुचतात. मात्र श्रम करण्याची प्रवृत्ति लोकात असली पाहिजे. श्रीपतरावानी चालविलेल्या प्रयत्नामुळे लोकांची उद्योग करण्याची प्रवृत्ति वाढीस लागली. जसजसे नव्या सुधारणेचे फळ त्यांच्या पदरात पडलेले दिसू लागले, तसतसा त्यांचा उत्साह वाढला.

त्या वर्षी मृगनक्षत्राचा पाऊस बेताने पडला. त्यानंतर श्रीपतराव आपल्या मुलाना घेऊन शिवारातून हिंडत होते. त्यानी आपल्या बरोबर आठ दहा तरुणही घेतलेले होते. त्यांच्या हाती फावडी कुदळीही होत्या.

असा संच पाहाताच ज्या शेतातून ते हिंडत असत, त्या शेतातील शेतकरीही आपापले काम बंद ठेवून श्रीपतराव काय उद्योग करतात हे पाहण्यास येत असत. श्रीपतरावाना त्या लोकांचीही मदत पाहिजेच असे.



तरडगावच्या दक्षिण बाजूस एक मोठी ओघळ किंवा लहानसा ओढा होता. पावसाळ्यात त्याला थोडेच पाणी येत असे. याचे कारण, तो ओढा गावच्या शिवारातूनच निघालेला होता. त्या शिवारात तर पाऊस बेताचाच पडत होता. त्यामुळे त्या ओघळीला म्हणजे

छोट्या ओढ्याला पावसाळ्यातही नेहमी वाहाणारे पाणी दिसत नसे.

श्रीपतरावानी आता गावच्या शेताना ताली घालून घेतलेल्या होत्या. त्या तालीत जे जादा पाणी साठत असे, ते बाहेर सोडण्याच्या सांडीही ठेविलेल्या होत्या. त्यांच्या योगाने अनेक ओघळी उत्पन्न होऊन त्या निरनिराळ्या वाटानी उताराकडे वाहात जात होत्या आणि मोठ्या ओढ्याला मिळत होत्या.

श्रीपतरावानी आता असा विचार केला कीं, या ओघळींचे पाणी बेताबेताने अडवीत अडवीत गावच्या मोठ्या ओढ्यात नेले तर तेथे पाणी नेहमी वाहू लागेल.

मृगाचा पाऊस पडत असताना त्यानी शिवारातून हिंडून हा अंदाज केलेलाच होता. त्यानी गावचा चढ-उतारांचा नकाशाही काढून आपल्या हाती घेतलेला होता. त्यांचा हा प्रयत्न ूर्वीपासूनचा होता.

श्रीपतराव तालीतून निघालेल्या ओघळी वळवून ते पाणी मोठ्या ओढ्यात नेण्याची तजवीज करीत होते! त्यासाठी त्याना अधिक बांध घालावे लागत होते, कांही ठिकाणच्या बांधाना बळकटी आणावी लागत होती. या सर्व गोष्टी ते बरोबरच्या जवानाकडून आणि त्या त्या शेतकऱ्याकडून झपाझप करवून घेत होते.

हिंमतराव व विजया हे दोघे श्रीपतरावांच्या कामाचे निरीक्षण करीत होते. हिंमतरावाना चाललेल्या कामाची कांहीशी कल्पना आली, पण विजयेला मात्र श्रीपतरावांचा हेतु समजला नाही !

दुपारच्या वेळी ते आपल्या शेतातच जेवण करीत आंब्याच्या झाडाखाली बसलेले असता विजयेने श्रीपतरावाना विचारले, “ बाबा ! तुम्ही शेतातून हिंडून कसला उद्योग चालविलेला आहे, हे कांही माझ्या लक्षात येत नाही. तुम्ही त्याचा खुलासा करता काय ? ”

हिंमतराव म्हणाले, “ विजया, बाबा काय करतात, हे तुला समजले नाही ? बाबा कांही तरी नवा चमत्कार करून दाखविणार आहेत. आपण स्वस्थ राहून पाहू या काय होत आहे तें ! ”

यावर श्रीपतराव फक्त हसले. त्यावेळी त्यानी विजयेला कांहीच उत्तर दिले नाही !

## २. पक्का पानाडी

जेवण झाल्यानंतर पुन्हा त्यांची कामाला सुरुवात झाली. सायंकाळपर्यंत कष्टाचे काम करावे लागत असल्यामुळे सर्वजण अगदी दमून जात असत. बरोबर घेतलेल्या इसमांची मजुरी मजुरांच्या बँकेमध्ये दाखल होत असे. सोसायटीच्या नफ्यातून ती मजुरी त्याना वर्षाचे शेवटी हिशेब झाल्यावर मिळणार होती.

अशा प्रकारे काम पुरे झाल्यानंतर एके दिवशी सोसायटीची सभा भरली होती. तेव्हां तुकारामाने श्रीपतरावाना विचारले,

" माहिना दीड माहिना काय काम केलेत तुमी, काका ? सगळ्या गावाच्या शिवारातली जिमीन उलथी पालथी केलीत कीं ! "

गणपत पाटील म्हणाले, " आता तालीतुली जास्त पक्क्या केल्या श्रीपतरावानी. आता कुठं त्या फुटणार नाहीत. हे काम काय थोडं झालं ? "

श्रीपतराव म्हणाले,

" मी काम तर करवून घेतले आहे अगदी बरोबर ! मात्र हस्ताचा पाऊस जर जोराचा पडला तरच माझ्या कामाचा परिणाम काय होतो, हे मला कळून येईल ! "

२१-८-६६
बालवाङ्मय
७६१
१५।२।८०



मारुती म्हणाला, " आता पाण्यानं डोळं वटारल्याती. पिण्याच्या पाण्याच्या आडाना व हिरीना पाणी न्हाई. सालोसाल अशीच रड चालली हाय आमच्या गावची !" जानोजी म्हणाला, "अवो, असं रडता कशाला राव ! आपुन गावची साळा बांधली, तशा हिरीबी काढू या आपून ! मंग पानीच पानी व्हईल भरपूर समद्या गावाला पुरंल एवढं !"

एक वृद्ध शेतकरी म्हणाला, " पन त्या नव्या हिरीना खरं पानी लागंल का ? एकाद्या पानाड्याला तरी इचारा अदुगर ! न्हाईतर फुकाट आपली हडं नरम व्हायची !" श्रीपतराव म्हणाले, " मी पानाड्याच आहे की ! आपल्या गावचा आतला खडक कांही अगदी काळा फत्तर नाही. तेव्हां विहीर खूप खोल खोदली तर कदाचित् भरपूर पाणी लागेल. पण खात्री देता येणार नाही मला !"

तो शेतकरी म्हणाला, " मंग पक्कं पानाडी न्हाई आपुन शिरपतराव ! दुसरा चांगला पानाडी बगितला पाहिजे आपल्याला !"

श्रीपतराव म्हणाले, " आता तर आपण विहीर

काढीत नाही ना ? शेतीची कामे चालू आहेत. ती कामे पुरी झाली म्हणजे तुम्हाला काही दिवस मोकळे मिळतील. नंतर आपण नवा विचार करू. तुमच्या गावाला पाणी भरपूर मिळाले पाहिजे, असेच तुमचे मागणे आहे ना ? पानाडी काय, जमिनीतील पाणी शोधतो. मला तसे पाणी शोधता येतेच. पण जमिनीवर पडणारे पाणीही आडविता येते. आपण काम करून पाणी अडवू. आता मी तुम्हाला कच्चा पानाडी वाटत असलो, तरी चार सहा महिन्यात पक्का पानाडी होईनच मी !"

ते बोलणे तूर्त तेथेच थांबले.

## ३. ओघळीचा ओढा झाला !

पुढे दोन तीन नक्षत्रांचा पाऊस मुळीच पडला नाही, तरीपण तालीकाठची पिके तग धरून होती. बाजरीचे पीक हातचे जाईल असे वाटत होते. भुईमूग करपू लागला होता. लोक पावसासाठी आकाशाकडे डोळे लावून बसले होते !


पिण्याच्या पाण्याची हकाटी गावभर झाली.

उत्तरा नक्षत्र लागले, तेव्हां आकाशातून ढग फिरू लागले. आता पाऊस पडेल, असे लोकाना वाटू लागले. पण पाऊस पडला नाही ! लोकांची तोंडे हिरमुसली !

पण उत्तरा संपून हस्त लागण्याच्या सुमारास आकाशात मेघांचा गडगडाट होऊ लागला. एक दिवस रात्री जोराचा पाऊस पडला. जमीन शांत झाली. पुढे दोन दिवस एकसारखे पाणी पडले. गावची ओघळ पाण्याने भरून गेली. तिला ओढ्याचे भव्य स्वरूप आले. कधी नव्हत झालेला हा प्रकार पाहून तुकाराम धावतच श्रीपतरावाकडे आला आणि म्हणाला,

" आपल्या गावचा ओढा आता मोठा झालाय ! केवढा पूर आलाय त्याला ! बगायला चला आपून ! "

हिंमतराव, विजया आणि श्रीपतराव ही मंडळी पूर पाहाण्यास गेली. सारा गाव पूर पाहण्यास लोटला होता ! श्रीपतराव चहूबाजूनी हिंडून पाहाणी करीत होते. त्यानी कांही खुणा करून ठेवल्या. शेताशेतातील



तालीतून बाहेर पडलेले पाणी त्यांच्या योजनेप्रमाणे निरनिराळ्या ओघळीतून वाहात येत येत मुख्य ओघळीस कसे मिळते, हेही त्यानी नजरेखाली घातले. त्यामुळेच एवढा मोठा पूर प्रथमच त्या छोट्या ओढ्यास आला होता !

हा पूर का आला, याचे कारण हिंमतरावांच्या लक्षात आले आणि ते विजयास म्हणाले,

" पाहिलेस विजया, बाबानी उन्हाळ्यात करवून

घेतलेल्या शेतातील कामाचा परिणाम हा ! बाबानी केलेला हा चमत्कारच नव्हे का ?"

विजया म्हणाली, "मलाही आत्ता बाबानी केलेल्या कामगिरीचे स्वरूप कळले. पण हे पावसाळी पाणी आले तसे वाहून जाणार ! याचा उपयोग गावाला कोणता होणार आहे बरे ?"

त्यांचे संभाषण श्रीपतरावही ऐकत होते. नंतर ते म्हणाले, "या पाण्याचा उपयोग गावाला कसा करून घ्यावयाचा याचीही योजना मी ठरवून ठेविली आहे. क्रमाक्रमाने ती लोकापुढे मांडू."

यानंतर सुगीच्या कामात सर्व लोक गुंतले. निरनिराळी पिकेही निघाली. सोसायटीचे काम छान चालले होते. विजयेच्या प्रयत्नाने बायकानाही शिक्षणाची गोडी लागली होती. गावाचे पाण्याचे हाल लवकरच दूर होणार आहेत, असे तिने बायकाना सांगितले होते. त्यामुळे विजयेवर बायकांची फारच श्रद्धा बसली ! त्या बायका पहाटे दळताना विजयेचे गाणे म्हणू लागल्या. त्यातील एक ओवी पुढीलप्रमाणे होती.

आली ग देवी आली।
समद्या गावाची माऊली।
विजयाबाई धन्य झाली।
तरडगावी ॥

श्रीपतरावानीही सरकारकडे तरडगावच्या पाणी पुरवठ्याविषयी प्रयत्न चालविले होते. त्यानी आपली एक योजनाही सरकारकडे पाठविली होती. सरकारी अधिकारीही त्या योजनेच्या पाहाणीसाठी आले होते. त्यावेळी मात्र पाटलाना श्रीपतरावांच्या प्रयत्नाची थोडी-बहुत कल्पना आली.

लोकमत हळूहळू कसे बनवावे लागते, हे श्रीपत-रावाना चांगले माहीत होते. त्यानी पाटलाना आपली योजना समजावून दिली. त्यामुळे त्या योजनेची चर्चा गावात सुरू झाली.

सरकारकडून श्रीपतरावानी आश्वासन मिळविले असले, तरी ती योजना लोकानी स्वावलंबनानेच पार पाडावी, असे श्रीपतरावांचे मत होते.

सुगीची कामे संपल्यानंतर एके दिवशी सायंकाळी गावचे लोक जमले असताना श्रीपतराव म्हणाले, "कसं काय तुकाराम, यंदाची सुगी कशी काय झाली ?"

तुकाराम म्हणाला, "काय सांगावं काका! तुमचं म्हननं आमी ऐकलं, म्हनुनशान जिमिनीतनं सोनं पिकू लागलं. देवाची अन् तुमची किरपा! दुसरं काय?"

मारुती म्हणाला, "यंदा देवानं आमाला एक चमत्कार दाखवला. आमच्या गावच्या ओगळीचा ओढा झाला! केवडा पूर त्येला आला! तुमी समद्या शिवरातलं वाया जानारं पानी ओढ्यात आणलं!"

गणपत पाटील म्हणाले, "पण आले तसे गेले! ते पाणी टिकले कुठे?

तुकाराम म्हणाला, "ते जितं पानी व्हतं कुठं? ते आडवून ठेवलं तर समद्या गुराना पानी मिळंल. पन ते कोन करनार?"

श्रीपतराव म्हणाले, "कोण करणार म्हणजे आपणच करणार! पावसाळ्यात पुराचे पाणी साठवून त्याचे मोठे तळे आपल्याला करता येईल. मात्र सर्व गावाने श्रम करण्याची तयारी केली पाहिजे. बाकीची सारी व्यवस्था करू आम्ही!"

सर्व लोक म्हणाले, "आमची तयारी आहे."

## ४. बांधकामातील अडचणी

श्रीपतरावानी आखणी केल्याप्रमाणे उन्हाळा सुरू झाल्याबरोबर तळ्याच्या कामास सुरुवात झाली. तळ्यांचे काम पुरे झाल्यानंतर पिण्याच्या गोड्या पाण्याची व्यवस्था करू, असे श्रीपतरावानी गावकऱ्यास सांगितले होते. ती व्यवस्था कशी करावयाची याचे स्वरूप मात्र त्यानी स्पष्ट केले नव्हते.

लोकानी श्रमदान करावे आणि इतर खर्च सरकारने द्यावा अशी कामाची योजना ठरलेली होती. मधून मधून सरकारी अधिकारीही तळ्याचे काम पाहाण्यास येत होतेच.

श्रीपतराव स्वतःच मोठे इंजिनिअर असल्यामुळे हे छोट्या तळ्याचे काम त्यांच्या दृष्टीने क्षुल्लकच होते. पण गावच्या लोकाना असे वाटत होते कीं, आम्ही हे फार मोठे काम करीत आहोत !

ओढ्याला बांध घालावयाचा तो मातीचाच घालावयाचा होता. ज्या बाजूस तळे तयार करावयाचे होते, तो भाग माळरानाचाच होता. त्यामुळे तळ्याच्या कामास कोणाचा फारसा अडथळा नव्हता.

पण त्या बाजूस एक जुने लहानसे विठोबाचे देऊळ होते. ते मात्र पाण्यात बुडण्याचा संभव होता. ते फार जुने असून शंभर वर्षापूर्वी हरिजनापैकीच एका वारकऱ्याने बांधलेले होते. ती जमीनही त्याच्या वंशातील एका वारसाच्या मालकीची होती.

त्या देवळाकडे कोणाचे फारसे लक्ष नव्हते. त्या देवळाचा वापर क्वचित् हरिजनच करीत असत. ते देऊळ गावाबाहेर बऱ्याच अंतरावर असल्यामुळे गुराख्या-खेरीज कोणी तिकडे फारसे फिरकतही नसत. पण ते आता तळ्यात बुडेल, असे वाटत असल्यामुळे हरिजना-मध्ये असंतोष पसरला. त्यापैकी एक प्रमुख जानुजी महार म्हणाला,

" आमचं देवाळ आन जिमीन बी तळ्यात जानार. तवा गावकरी दादानो, त्येचं तुमी काय करनार, सांगा आमाला ! "

मारुती म्हणाला, " गावाचं तळं हाय, तवा तुमी आपली जिमीन व देऊळ गावाला देऊन टाका. "

पिराजी म्हणाला, " तसं कसं हो म्हनता ? आमची जिमीन घेता, आन देऊळबी बुडवून टाकता ! आमाला कबूल न्हाई तुमचा असला कारबार ! "

हा तंटा वाढण्याचा संभव आहे, असे गणपत पाटलाना वाटले. श्रीपतरावांच्या कानावर ही चर्चा गेली होतीच. त्यातून काय मार्ग काढावा याचा विचार ते आता करीत होते.

श्रीपतराव आपल्या मुलाना घेऊन त्या देवळाकडे गेले. देऊळ पडकेच होते. पण आत मात्र विठ्ठल रखुमाईच्या सुंदर मूर्ति होत्या. त्या देवळात जळमटे साचली होती. देवाची पूजा कोणी करीत नव्हतेच. त्यावेळी हिंमतराव म्हणाला,

" देवळाची दुर्दशा कशी झालेली आहे, ते पाहा. अशी देवळे असण्यापेक्षा नसलेलीच बरी, असे कोणालाही वाटणार नाही का हो बाबा ! "

विजया म्हणाली, " देवळाच्या आतील मूर्ति मात्र सुंदर आहेत. तरी या मूर्तींना शोभेसे मंदिर उभारले तर चांगले होणार नाही का ? "

श्रीपतराव म्हणाले, " तोच विचार माझ्या मनामध्ये आलेला आहे. लोकांची पोटापाण्याची सोय झाली तरी त्यांच्या मनावर चांगले संस्कार झाले पाहिजेत ! तरच लोक सद्‌गुणी बनतील. आपल्या गावच्या लोकांची मने चांगली तयार होण्यास त्यांची

देवावरची श्रद्धा वाढली पाहिजे. सर्व जातीना व समाजातील सर्व घटकाना विठोबाची भक्ति आवडणारी आहे. पंढरीस जाणाऱ्या वारकऱ्यात जातिभेद नसतो. विठोबाची भक्ति करणारे स्पृश्य व अस्पृश्य असे संत झालेले आहेत. तेव्हां आपल्या गावी विठोबा रखुमाईच्या या सुंदर मूर्ति आहेतच. त्यांच्यासाठी एक सुंदर देऊळ बांधावे आणि ते सर्व जातीना खुले असावे, अशी व्यवस्था केली तर ती एक चांगली सामाजिक सुधारणाच होणार आहे ! ”

हिंमतराव म्हणाले, “ गावच्या लोकाना ही गोष्ट आपण आता पटवून दिली पाहिजे.”

विजया म्हणाली, “ ते काम बाबा उत्तम प्रकारे करतील. बायकांची संमति मिळविणे माझ्याकडे लागले.”

नंतर श्रीपतरावानी गावच्या सर्व लोकांची बैठक भरविली. त्यांच्यापुढे आपले सर्व म्हणणे सांगून शेवटी ते म्हणाले,

“ हरिजनांची जमीन जात आहे. तिचा आपण मोबदला देऊ या आणि त्यांच्या देवळातील विठोबा-रखुमाईच्या मूर्ति घेऊन साऱ्या गावासाठी गावाच्या मध्यभागी एक चांगले देऊळ बांधू या. ”

पिराजी म्हणाला, “पन त्या देवळात आमी सारे दर्शनास येऊ. पुजारी कुनीबी चांगला मानूस ठेवा. पुजाऱ्यानं मास मच्छर खाऊ नये. दारूबी पिऊ नये.”

गणपत पाटील म्हणाले, “आता सरकारने दारूबंदी केली आहे. दारूचे नाव काढणे हे देखील मोठे पाप आहे आणि दारू पिणे हा गुन्हा आहे !”

पाटलांच्या म्हणण्यावर सर्व लोक जोराने हसले. शेवटी असे ठरले कीं, गावाच्या मध्यभागी विठ्ठल-रखुमाईचे देऊळ बांधावे, त्यात ह्या बुडणाऱ्या देवळातील मूर्ति असाव्या. पुजाऱ्यानेच देवाची पूजा करावी. तो सच्छील असावा. दर एकादशीस सर्वांनी एकत्र भजन करावे. त्यात कसलाही भेदाभेद पाळू नये. हरिजनांच्या जाणाऱ्या जमिनीचा योग्य मोबदला गावकऱ्यानी द्यावा.”

सर्व लोकानी ‘पुंडलीक वर दे हारी विठ्ठल’ म्हणून या तडजोडीस मान्यता दिली !

# ५. तळ्याचे बांधकाम

त्यानंतर तळ्याचे काम जोराने सुरू झाले.

श्रमदान करण्यास स्वतः श्रीपतराव तर होतेच, पण हिंमतराव आणि विजया हेही भाग घेत होते. ओढा आडवून त्याचे तळे करावयाचे आणि तळे भरून जास्त पाणी झाल्यास ते दुसऱ्या बाजूने सांड काढून पुन्हा ओढ्यात सोडावयाचे, अशी ती व्यवस्था होती.

गावची सर्व माणसे, जमीन उकरणे, पाट्या



भरणे, त्या भरावावर टाकणे ही कामे अगदी शिस्तीत करीत होती. जमीन खणताना, पाट्या भरताना आणि त्या भरावावर टाकताना तुकारामाने रचलेले पुढील गाणे कामकरी एकाच तालासुरात म्हणत होते.

जिमिन खणू या र खणू या ।
जिमीन खणू या ॥
पाट्या भरू या र भरू या ।
पाट्या भरू या ॥
उचलू या र उचलू या ।
पाट्या उचलू या ॥
कामं करू या र करू या ।
भराव भरू या ॥

अशा प्रकारे पुरुष, बायका, मुले, सर्वजण काम करीत होते. सुमारे दोन तीन महिने हे तळ्याचे काम चालले होते. तळ्याचे काम पुरे झाल्यानंतर सर्वांना समाधान वाटले. त्यानंतर गावकऱ्याना श्रीपतरावानी पुरणपोळीचे जेवण दिले.

पुढे त्याचवेळी ठरले कीं, आता हातासरशी विठोबाचे देऊळही बांधावे. प्रथम ते साधेच बांधावे. त्यानंतर पुढे त्यात सुधारणा करावी.

खेड्यातील लोकांचा उत्साह पाहून श्रीपतरावाना समाधान वाटले. त्यानी त्याना सर्व प्रकारचे सहाय्य केले.

ते देऊळ बांधून झाल्यावर आषाढ शुद्ध एकादशीस पंढरपूरची यात्रा भरते, त्या दिवशी त्या देवळात मूर्तींची स्थापना करावी असेही ठरले.

# ६. रहाटाच्या विहिरी

तळ्याचे व देवळाचे काम आटोपल्यानंतर लोकाना हायसे वाटले. पण पिण्याच्या पाण्याची सोय झाली नव्हती. तेव्हा एकदा सोसायटीच्या बैठकीच्या वेळी मारुती म्हणाला, “ शिरपतराव, तळं तयार केलं, देऊळही बांधलं, पन अजून देव पावत न्हाई आमाला. दुष्काळ संपत न्हाई तो न्हाईच ! ”

पाटील म्हणाले, “ पी हळद की हो गोरी, असं का होत असतं कधी ? आता पाऊस पडला कीं तळं भरेल. मग गावाला भरपूर पाणी होईल की नाही ? ”


तुकाराम म्हणाला, “ तळ्यातलं पानी खर्चाया हुईल, पन पिन्याचं पानी कसं मिळायचं राव ? ”

श्रीपतराव म्हणाले, “ आता तुम्हाला मी काय करायचे ते सांगतो. पिण्याच्या पाण्याची चांगली सोय व्हावी, म्हणून तळे बांधले आहे. तळ्यात पाणी भरले म्हणजे गावातल्या आडानाही भरपूर पाणी येईल. आणखी असं करू या कीं, तळ्याच्या खालील बाजूस लहान विहिरी काढून त्याना रहाट बसवू या. त्या विहिरींना तळ्यातील पाणी झिरपून येईल आणि गावाला पिण्याला व धुण्यालाही भरपूर पाणी होईल. ”

पाटील म्हणाले, “ आपल्याला लोकलबोर्डाचीही मदत मिळेल. आपण कामाला सुरुवात तर करू या. ”

पिराजी म्हणाला, “ मग आमची सोय कशी होनार ? आमाला पाणी कसं मिळनार ? ”

हिंमतराव म्हणाले, “ पिराजी, आता शिवाशीव कोणी पाळावयाची नाही, असा कायदा झालाय ना ? मग विहिरी बांधल्या आणि त्याना रहाट लावले म्हणजे कोणीही रहाटाने विहिरीतील पाणी काढून घ्यावे. मात्र त्याने स्वच्छता चांगली राखली पाहिजे. ”



पिराजी म्हणाला, “ तर मग आमची समजूत पटली. आताच विहिरी खोदू या. आमची मानसं तयार आहेत काम करायला. ”

सर्वांच्या विचाराने विहिरी खोदण्याचे ठरले.

श्रीपतरावानी आखून दिल्याप्रमाणे विहिरींचे खोदकाम झाले. आणि त्याना रहाट बसविण्याचीही सोय करण्यात आली.

त्यावेळी तुकाराम म्हणाला, " जेवनाची सगळी तयारी झाली. ताटं मांडली. पन भाकरीच वाडायला न्हाई, असं झालंय आज ! तळं बांधलं, हिरी खणल्या, रहाट लावलं, पन पान्याचा ठिपुसबी न्हाई त्यात. आहे की नाही गंमत ! "

योगायोग असा कीं, त्याच दिवशी आभाळात गडगडाट होऊ लागला. चार दिवस चांगला वळवाचा पाऊस पडला. त्यामुळे अर्धे अधिक तळे भरले !

तळ्यातील पाणी पाहून लोकाना विलक्षण आनंद झाला !

## ७. पाणीच पाणी

त्यानंतर मृग नक्षत्राचा एक पाऊस चांगला झाला. पुढील दोन नक्षत्रांचाही पाऊस चांगला पडला. त्यामुळे तळे काठोकाठ भरले. ओढ्यालाही पाणी झुळझुळू वाहू लागले. नवीन काढलेल्या विहिरीत पाण्याचे पाझर फुटू लागले.

तळ्याला भरपूर पाणी झाले. श्रीपतरावांची योजनाच अशी होती कीं, गावच्या शिवारातील बहुतेक पाणी तळ्यात यावे. त्यासाठी त्यानी तळ्याचा बांध खूप उंच बांधला होता. मातीचा उपयोग करून धरणे बांधण्याची योजना अमेरिकेत सुरू आहे हे त्याना माहीत होते. या तळ्याच्या बांधणीत तोच प्रयोग त्यानी केला. त्यांच्या अजमासाप्रमाणे तळे यापेक्षाही मोठे पाहिजे असे त्याना वाटत होते. पण सध्याचा प्रयोग पाहून नंतर तळे वाढविण्याचा विचार ते पुढील वर्षी करणार होते.

त्यानी ओढ्यातील मुरमाची व खडकाची तपासणी केलेली होती. तळ्यातील पाणी झिरपून येऊन ओढ्यासही कांही काळ ते पाणी टिकेल असे त्याना वाटत होते. यासाठी त्यानी त्या ओढ्यात कांही ठिकाणी खोलगट भाग तयार केले आणि लोकाना धुण्यासाठी तेथे दगडी

फरशांची सोय करून दिली. ओढ्यातील पाणी गावाच्या बाहेर जेथे पडत होते, तेथे त्यानी मोठा खोलगट भाग तयार करून एक डोह तयार केला. त्या डोहाचा उपयोग पिराजीच्या धंद्यास लागणारे घायाळ कुजविण्यासाठी करावयाचे त्यानी ठरविले होते.

तळ्यातील पाणी घाण होऊ नये यासाठी श्रीपतरावानी त्या तळ्याच्या बाहेरील बाजूस कुंपण घालण्याचे ठरविले होते. जनावराना पाणी पिण्याची सोय व्हावी, यासाठी त्यानी तळ्याची एक बाजू मोकळी सोडलेली होती.

ही व्यवस्था पाहून तुकाराम म्हणाला,

" मुक्या जनावराना पानी मिळंल आता पोटभर! न्हाईतर त्यांचं हाल फार व्हत व्हतं श्रीपतकाका!"

श्रीपतराव म्हणाले, " जनावरांची आणि माणसांची पाणी पिण्याची सोय गावाला करता आलीच पाहिजे. अन्न पोटभर मिळालं तरी पाणीही पोटभर मिळालंच पाहिजे ना ? "

तुकाराम म्हणाला, " गावच्या आडाला पाजर सुटलाय चांगला. ओढ्याच्याजवळ आड काढलं हायत. त्यानाबी पानी आलंय ! "

श्रीपतराव म्हणाले, "तळ्याचे पाणी पाझरून तशा

आडाना पाणी येईलच की. तसेच आड काढले आहेत ते. गावच्या हरिजनाना आणि सगळ्या गावाला त्या आडांचे पाणी मिळेल. त्याला रहाट लावू म्हणजे झाले. कोणीही रहाटाने पाणी काढले तरी हरकत नाही ना ?”

तुकाराम म्हणाला, “आता कसलीबी हरकत न्हाई. त्येंचा इटोबा आपुन देव करनार. आन सरकारी कायदाबी झालाय, समद्यानी पानी घ्यावं म्हनून. मंग हरकत कोन करनार. मातर आडांची जागा घान होऊ नये म्हणजे झालं.”

श्रीपतराव म्हणाले, “अहो तुकारामबुवा, आडाच्या सभोवती फरशी बसविणार आहोत आपण. त्यामुळे रहाटाने काढलेल्या पाण्यात आडाच्या कडेला चिखल होणार नाही. धुण्यासाठी दूर दूर कुंड्या बसवायच्या आहेत आपल्याला. मग तर होणार नाही ना चिखल ?”

तुकाराम म्हणाला, “काका, छान इचार आहे तुमचा ! आपलं गाव अक्षी नामी सुधारता तुम्ही. देवानं तुमाला पुष्कळ औक्ष द्यावं !”

श्रीपतराव म्हणाले, “अन्नपाण्याची सोय झाली, लोक स्वच्छतेने वागू लागले, शिकू लागले, प्रामाणिक-पणाने वागू लागले तर सर्वजण सुखी होतील व त्यांचे आयुष्यही वाढेल !”

लोकाना पिण्याला, धुण्याला पाणीच पाणी झाले. जनावराना पाणी मिळण्याची सोय झाली. बायकानी विहिरीची पूजा करून पाणी भरण्यास सुरुवात केली. त्याना तर विलक्षण आनंद झाला !


रहाटावरून पाणी काढताना त्या पुढील गाणे एकसुराने म्हणू लागल्या—

पाणीच पाणी झालं ग बाई ।
पाण्याची काळजी गेली ग बाई ॥
धुण्याला पाणी झालं ग बाई ।
पिण्याला पाणी झालं ग बाई ॥
देवानं पाणी दिलं ग बाई ।
विजया मावलिचा पायगुण ग बाई ॥
पाणीच पाणी झालं ग बाई !....

पाणीच पाणी होऊन तरडगावास आनंदीआनंद झाला. पुढे आषाढी एकादशीस पांडुरंग आणि रखुमाई यांच्या मूर्तींची स्थापना झाली. तुकारामाकडे लोकानी पुजारीपण दिले. लोकानी टाळ, मृदंग आणून भजन केलं. पिराजी, जयाजी वगैरे सर्व हरिजन भजनात सामील होते. त्या भजनात विजयेने पुढील अभंग भक्तियुक्त अंतःकरणाने अत्यंत गोड आवाजात म्हटला.

२९७६६
बालवाङ्मय
७ ६१
नों. दि. १५।१२।५८
वाचनालय

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवोनीया ॥



तुळशीहार गळा कासे पितांबर ।
आवडे निरंतर हेंचि रूप ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठीं कौस्तुभ मणी विराजीत ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥

शेवटी सर्वांना गोड प्रसाद मिळाला. स्पृश्य व अस्पृश्य समाजांचा सामुदायिक गोड समारंभ संपला. सर्व गावकरी श्रीपतरावाना धन्यवाद देत आपापल्या घरी परतले !

IRBK-0106299
IRBK-0106299

# रामतनय यांचें वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १. **मोहित्यांची मंजुळा** (आवृत्ति दुसरी)<br>गाजलेली सामाजिक कादंबरी | ४ | रु. |
| २. **खरा उद्धार** (मोठी चौथी आवृत्ति छापत आहे)<br>ग्रामीण जीवनावरील अत्यंत उद्बोधक कादंबरी | ३ | ,, |
| ३. **साखर गोटी**<br>१९४२ च्या चळवळीवरील अत्यंत गोड कादंबरी | ५ | ,, |
| ४. **तिघी जणी** ( दुसरी आवृत्ति छापत आहे )<br>आंतरराष्ट्रीय राजकारणावरील उद्बोधक कादंबरी | ३ | ,, |
| ५. **प्रमिला बेन**<br>महात्माजींच्या तत्त्वज्ञानावरील उत्कृष्ट कादंबरी | ४ | ,, |
| ६. **तापीतीरीं**<br>अत्यंत गाजलेली राजकीय कादंबरी | ५ | ,, |

## विद्यार्थ्यांसाठीं व प्रौढांसाठीं

| | | |
|---|---|---|
| ७. **कॅप्टन प्रताप** भाग १ ला (सुधारलेली तिसरी आवृत्ति ) | १॥ | ,, |
| ८. **कॅप्टन प्रताप** भाग २ रा (सुधारलेली दुसरी आवृत्ति) | २ | ,, |
| ९. **कॅप्टन प्रताप** भाग ३ रा (छापत आहे) | २ | ,, |
| १०. **गजाभाऊ**<br>( श्रेष्ठ प्रतीचें सांस्कृतिक ग्रामीणजीवन ) | १॥ | ,, |
| ११. **खरा उद्धार** (सुधारलेली सचित्र सातवी आवृत्ति) | ३ | ,, |
| १२. **बाळू नि बगडी** ( दुसरी आवृत्ति छापत आहे ) | ८ | आणे |

---

रामतनय, ४६४ नारायण पेठ, पुणें २.